**महाराष्ट्र शासन**

क्र. अमृत-२०१८/ प्रक्र.१७५/ नवि-३३
नगर विकास विभाग, ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
**दिनांक :- २६ सप्टेंबर, २०१८.**

**प्रति,**
**आयुक्त,**
**सोलापूर महानगरपालिका, जि. सोलापूर.**

**विषय:-** अमृत अभियानांतर्गत मंजूर सोलापूर शहर मलनिस्सारण **प्रकल्प** स्थापत्य कामांच्या निविदा स्वीकृतीबाबत.....

**संदर्भ:- १.** आपले पत्र क्र. जावक क्र./सा.आ.अ./ज.नी/३०, दिनांक ०९.०४.२०१८.

**२.** रिट याचिका क्रमांक ५७०२/२०१८ (संतोष कांबळे वि. महाराष्ट्र शासन व इतर) प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे दिनांक २६.०९.२०१८ रोजीचे आदेशाबाबत सोलापूर महानगरपालिकेचे वकील श्री.धनुरे यांचा दि.२६.०९.२०१८ रोजीचा ई-मेल संदेश

**महोदय,**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर करण्यात आलेल्या **सोलापूर शहर मलनिस्सारण प्रकल्पामधील स्थापत्य कामांच्या** निविदा स्वीकृतीस राज्यस्तरीय तांत्रिक समितीची मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास संदर्भाधीन क्रमांक १च्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे.

**०२.** आपल्यामार्फत सादर करण्यात आलेला निविदा स्वीकृती प्रस्ताव केंद्र शासनाच्या सूचनेनुसार राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या दिनांक **११.०४.२०१८** रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. सदर बैठकीमध्ये **सोलापूर शहर मलनिस्सारण प्रकल्पामधील स्थापत्य कामांच्या** निविदा स्वीकृतीच्या अनुषंगाने राज्यस्तरीय तांत्रिक समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

"अमृत अभियान अंतर्गत **सोलापूर शहर मलनिस्सारण** प्रकल्पाकरिता **दास ऑफ शोअर इंजि.लि.प्रा .या लघुत्तम निविदाकाराची** सर्वात कमी दराची (**निविदा किंमतीच्या २.७० टक्के कमी दराची**) ही निविदा **चालू दरसूचीवर ४.८६ टक्के इतक्या कमी दराची** आहे. सदर **निविदा स्वीकृत करणेबाबतचा ठराव हा सोलापूर महानगरपालिकेने** केलेला आहे. **सबब सोलापूर शहर मलनिस्सारण प्रकल्पाच्या स्थापत्य कामांच्या निविदा स्वीकृतीबाबत सोलापूर महानगरपालिकेने केलेल्या ठरावास मान्यता देण्यात यावी .सदर प्रकल्पाचे कार्यादेश देताना त्यामध्ये स्वीकृत निविदेची नेमकी किंमत देखील नमूद करावी."**

**०३.** सदर प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल झालेल्या रिट याचिका क्रमांक ५७०२/२०१८ (संतोष कांबळे वि. महाराष्ट्र शासन व इतर) या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने सदर प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेस दिलेली स्थगिती दिनांक २६.०९.२०१८ रोजी उठवली असलेबाबत सोलापूर महानगरपालिकेच्या वकीलांनी संदर्भाधीन क्रमांक २ च्या ई-मेलद्वारे शासनास कळविलेले आहे.

०४. त्याअनुषंगाने सदर न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या २६.०९.२०१८च्या आदेशाची अंतिमत: खातरजमा करून प्रारुप निविदा प्रपत्रातील अटी व शर्तीच्या अधीनतेने, शासनाच्या निविदा प्रक्रियेच्या विहित कार्यपध्दतीस अनुसरुन कार्यादेश देण्याची पुढील कार्यवाही करावी.

**आपला,**

२६।८।१८

**(निलेश पोतदार)**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत :- सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई** यांना आवश्यक माहिती व कार्यवाहीसाठी.